

आनंद बक्षी: हजारों में एक...

साडेचार हजार गीतं लिहिणाऱ्या आनंद बक्षींच्या सर्जनशीलतेत क्वॉलिटी आणि क्वांटिटी या दोन्हींचा क्वचित आढळणारा सुमेळ होता. बॉलीवूडमध्ये असा यशस्वी गीतकार पुन्हा होईल?

□ अजित पोपट

'मी इतरांकडून गीतं लिहून घेऊन माझ्या नावावर खपवतो असा आरोप करणाऱ्यांना मूर्ख म्हणावं लागेल.' साधारणपणे सौम्य स्वभावाचे म्हणून प्रसिद्ध असलेले आनंद बक्षी 'जी' प्रतिनिधीला हे सांगताना मात्र थोडेसे रागावलेले दिसले. काही वर्षांपूर्वी आम्ही संगीतकार कल्याणजी-आनंदजींच्या म्युझिक रूममध्ये बोलत बसलो होतो.


त्याकाळी बक्षीजींच्या यशाने जळणाऱ्या काही स्पर्धकांनी त्यांच्याबद्दल अशी अफवा पसरवली होती की, आनंद बक्षी नवोदित गीतकारांकडून गीतं लिहून घेतात आणि आपल्या नावावर देतात. या आरोपांत किती तथ्य आहे ह्या प्रश्नाच्या उत्तरादाखल बक्षीसाहेब सांगत होते. ते पुढे म्हणाले, 'काही गीतकार-संगीतकारांच्या रचनांवर त्यांची छाप दिसतेच. आणि संगीतातले जाणकार ती बरोबर ओळखतात. माझ्या यशाने जळणारी काही मंडळी अशा अफवा उठवतात झालं.'

वातावरण हलकं करण्यासाठी कल्याणजीभाई मिश्किलपणे म्हणाले, 'असं म्हणू नका बक्षीसाहेब. यशस्वी गीतकारही कधी कधी 'सीएटी कॅट, कॅट माने बिल्ली...' सारखी गीतं लिहितो. आणि जयकिशनसारखे संगीतकार अभिमानाने म्हणतात, 'यह गाना हमारी स्टाईल का है...'

सहा फूट दोन इंच उंच. नम्र स्वभाव, गायक बनण्यायोग्य कंठ, समोरच्या व्यक्तीच्या मनाचा ठाव घेणारी नजर आणि स्वतःतच रमण्याची वृत्ती. यामुळे बक्षीसाहेबांचं व्यक्तिमत्त्व वेगळंच दिसायचं. ते बरेचदा स्वतःमध्येच हरवून जात. तुम्ही त्यांना अभिवादन केलंत तरी ते यंत्रवत त्याला उत्तर देत. मनात घोळणारं गीत पूर्ण झाल्यानंतरच ते तुमच्याशी खऱ्या अर्थाने बोलू लागत. आणि म्हणत, 'अरे तुम्ही कधी आलात?'



गीत-संगीताची मैफल: आनंद बक्षी, एक मित्र, कल्याणजीभाई, लता मंगेशकर आणि दिलीपकुमार



गीत रेकॉर्डिंगप्रसंगी: आनंद बक्षी, दिग्दर्शक रवी चोप्रा, संगीतकार शिव, लता मंगेशकर, निर्माता बी. आर. चोप्रा आणि संगीतकार रवी



राहुलच्या म्युझिक रिलिजप्रसंगी: रमेश तौरानी. अनु मलिक, आनंद बक्षी, सुभाष घई आणि प्रकाश झा

ओ. पी. नय्यर आणि आनंद बक्षी या दोघांत बरंच साम्य आहे. संघर्षाच्या दिवसात कंटाळून दोघांनीही मुंबई सोडून जाण्याची तयारी केली होती. पण इथे संधी मिळाली, आणि मिळाली ती अशी की पुन्हा परतण्याची वेळच आली नाही. आनंद बक्षींनी तर आपला गाशाही गुंडाळला होता. पण अचानक संधीने त्यांचा दरवाजा ठोठावला. बक्षीसाहेबांना मास्टर भगवानने पहिल्यांदा संधी दिली असं म्हटलं जात असलं तरी त्यांना खरं यश दाखवलं ते कल्याणजी-आनंदजी यांनी आणि तो चित्रपट होता *महेंदी लगी मेरे हाथ*.

या चित्रपटाचं शीर्षकगीत ऐकून (शंकर) जयकिशनने कल्याणजीभाईंचं अभिनंदन केलं. त्यावेळी कल्याणजीभाई बक्षीजींना गमतीत म्हणालेही, 'बघा, आपण जयकिशनची स्टाईल आत्मसात केली ना!'

पंडित दीनानाथ मधोक, प्रदीपजी आणि प्रेम धवन यांच्याप्रमाणे आनंद बक्षीही संगीतातले जाणकार होते. अनेकदा ते गीत लिहिता लिहिताच त्याची चालही बांधत. तशी संगीतकाराला त्याच्या पद्धतीने संगीत देण्याची पूर्ण मुभा होती. *मेहंदी लगी मेरे हाथ*नंतर त्यांना पुन्हा यश मिळालं ते *जब जब फुले खिले*मुळे. या चित्रपटाच्या एका गीतासाठी दिग्दर्शक सूरजप्रकाश बक्षींना प्रसंग समजावून सांगत होते. तो ऐकून घेतल्यावर बक्षीजींनी आपल्या खिशातून चुरगळलेला कागद काढला आणि सूरजप्रकाशच्या हातात देत म्हटलं, 'यह रहा आपका गाना.' त्यावेळी उपस्थितांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्यांच्या प्रश्नार्थक नजरांना कल्याणजींनी उत्तर दिलं की काश्मीरहून मुंबईत आलेल्या तरुणाला इथला झगमगाट आणि उच्चभ्रू जीवन पाहून काय वाटतं ते बक्षींनी आपल्या सुरुवातीच्या दिवसात अनुभवलं होतं आणि त्या भावना त्यांनी शब्दात उतरवल्या होत्या.

१९५७-५८मध्ये बक्षीजी मुंबईला आले. रावळपिंडीला जन्मलेले आनंद बक्षी बालपणापासूनच चांगलं गात होते. पण घरातली बरीचशी पुरुषमंडळी फौजेत रुजू होती. म्हणून बक्षीसाहेबही फौजेत दाखल झाले. लहान-मोठी कामं केली. कधी इलेक्ट्रिशियन तर कधी टेलिफोन ऑपरेटर... कुठलंही काम असो हाताबरोबर तोंडाने गुणगुणणं चालू असायचं. रोज संध्याकाळी ते बराकीतल्या जवानांना आपली गीतं ऐकवत. एकदा एका सहृदय मेजर मेहरोत्रानी त्यांची गाणी ऐकली आणि म्हणाले, 'तू लष्करात का आलास? तुझी खरी कदर मनोरंजनाच्या दुनियेत होईल. तेव्हा फौज सोड आणि एखाद्या मैफलीत जा.' आणखी एका सहृदय अधिकाऱ्याने पृथ्वीराज कपूरच्या नावाने त्यांच्याकडे एक चिठ्ठी दिली. पण पृथ्वीराज कपूरकडे अशा चिठ्ठ्या घेऊन रोज शेकडो माणसं येत. ते तरी कोणाकोणाला काम देणार. अखेरीस राज कपूरनेच भगवानदादांकडे शब्द टाकला आणि आपले पडतीचे दिवस असूनही भगवानदादांनी *भला आदमी* (१९५८) साठी गीतं लिहिण्याची त्यांना संधी दिली. पगार होता अडीचशे रुपये.

फिल्मी पार्ट्यांमध्ये आघाडीचे निर्माते किंवा अभिनेते आनंद बक्षींची साधी दखलही घेत नसत. त्यावेळी कोणीतरी त्यांची ओळख कल्याणजीभाईंशी करून दिली. कल्याणजी नवोदितांना संधी देण्यास नेहमीच तत्पर. त्यांना आपल्या म्युझिक रूममध्ये बोलवून खाऊ-पिऊ घालत. संघर्षाच्या दिवसांत आनंद बक्षींनी आपले कटू अनुभव या शब्दांत व्यक्त केले—


यहाँ मैं अजनबी हूं
मैं जो हू बस वही हू...

*जब जब फूल खिले*च्या सेटवर बक्षींना प्रसंग समजावून सांगणाऱ्या दिग्दर्शकाला त्यांनी हाच कागद पुढे केला होता आणि या चित्रपटाचं गीत-संगीत दोन्ही सुपरहिट ठरलं.

आणि तो बक्षींच्या आयुष्यातला जबरदस्त टर्निंग पॉइंट ठरला. कल्याणजी-आनंदजींकडे सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या लक्ष्मीकांत-प्यारेलालनी संगीतकार म्हणून स्वतंत्रपणे काम सुरू केलं होतं. या दोघांना बक्षींच्या गुणांची कदर होती. त्यांनी बक्षींना आपल्याकडे बोलावलं. आणि हिट गीत-संगीताचा सिलसिला सुरू झाला.

'जी' शी बोलताना प्यारेलाल आपले

आनंद बक्षी आणि जावेद अख्तर:
मिले गीतकार से गीतकार



अश्रू आवरू शकले नाहीत. ते म्हणाले, 'आधी लक्ष्मीकांत गेले आणि आता बक्षीजी. आणि बायपास सर्जरी होऊनही मी मात्र हे दिवस पाहायला जिवंत राहिलो आहे. ही (बक्षी) वॉज अ मास्टर ऑफ सिम्पलिसिटी. सरळ स्वभावाचा राजा माणूस. तुम्हाला बरेचदा बक्षीजींमध्ये मजरूह सुलतानपुरी, साहिर, प्रदीपजी आणि शैलेन्द्र यांचा समन्वय बघायला मिळेल. अचाट प्रतिभेची देणगी त्यांना लाभली होती.'

प्यारेलाल यांचं म्हणणं खरं आहे. 'सांची तुम्हरी प्रीत हो राम, जग का प्यार है झूठा...' (*बेदाग*, संगीत रोशन), 'के राम तू सब का रखवाला जब जब भी यह मन घबराया तूने आ के सम्हाला...' (*छोटा भाई*, संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल) ऐकल्यावर प्रदीपजींची आठवण येते. तर 'फूलों से मुखडेवाली, निकली है इक मतवाली...' (*आये दिन बहार के*) किंवा 'नैन मिलाकर चैन चुराना किसका है ये काम हम से पूछो हम को पता है उस जालिम का नाम...' (*आमने सामने*) ऐकताना हमखास हसरत जयपुरींच्या 'इचक दाना पिचक दाना...'सारख्या हलक्या फुलक्या गाण्यांची आठवण होते. ही तर एक-दोन उदाहरणं झाली. सगळ्या गाण्यांचा उल्लेख करायचा झाला तर मोठी यादीच तयार होईल. जितेंद्रला जेम्स बाँड बनवणाऱ्या फर्जमध्ये 'मस्त बहारों का मैं आशिक...' आणि 'हॅपी बर्थ डे टू यू...' ही दोन्ही गीतं बक्षींनी लिहिली होती.

राजेश खन्नाच्या कारकीर्दीला ज्या चित्रपटाने हात दिला त्या *आराधना*शिवाय *अमर प्रेम*, *कटी पतंग*, *दुश्मन*, *हाथी मेरे साथी* वगैरे चित्रपटांची जवळजवळ सगळीच गीतं हिट होती. राजेश खन्नाबरोबर पार्श्वगायक म्हणून किशोरकुमारलाही बक्षींच्या गीतांनी वेग दिला. देव आनंदला *हरे रामा हरे कृष्णा*ने जे यश मिळवून दिलं त्यात बक्षींचा वाटा मोठा आहे. एकीकडे 'दम मारो दम, मीट जाये गम...'सारखं गीत तर दुसरीकडे 'फूलों का तारों का सबका कहना है, एक हजारों में मेरी बहना है...'सारखं भावनांनी ओथंबलेलं गीत लिहिणारा गीतकार एकच आहे, यावर फार थोड्या लोकांचा विश्वास बसत असे.

आणि रमेश सिप्पीचा *शोले*... या चित्रपटाच्या प्रत्येक गीताशी काहीतरी आठवण जोडलेली आहे. अमिताभच्या स्टेज प्रोग्रॅमचं सदाबहार गीत 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है...' देखील बक्षींनी लिहिलं होतं.

१९६४ पासून आजपर्यंत, सुभाष घईंच्या *ताल*पासून यश चोप्रांच्या *दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे* आणि सनीच्या *गदर*पर्यंत सगळ्या चित्रपटांचे गीतकार एकच होते. चार दशकांच्या कारकीर्दीत त्यांनी साडेचार हजार गीतं लिहिली. प्यारेलाल म्हणाले होते तेच खरं, त्यांचा सरळ स्वभाव हेच त्यांच्या गाण्यांच्या यशाचं खरं रहस्य होतं. त्यांच्या गीतांत शब्दच्छल नसायचा, तर साधीसरळ रचना असायची. उदाहरण द्यायचं झालं तर 'इलू का मतलब आय लव यू...' किंवा 'अच्छा तो हम चलते है, फिर कब मिलोगे जब तुम कहोगे...' सारखी गीतं त्यांच्याच लेखणीतून साकारू शकतात.

गेल्या दीड-दोन वर्षांपासून बक्षीजी आजारीच होते. 'ताल से ताल मिला...'सारखी काही गीतं त्यांनी आजारपणात अंथरुणात बसून लिहिली होती. आजारपणातही त्यांची सर्जनशीलता तेवढीच टवटवीत होती. ३१ मार्च रोजी त्यांची जीवनयात्रा अचानक संपली आणि हा महान गीतकार कायमचा काळाच्या पडद्याआड गेला. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो हीच 'जी' परिवारातर्फे प्रार्थना. ●



आनंद बक्षी

जन्मः २१-७-१९३०
मृत्यूः 30-3-2002

१९५७ *सिल्वर रिंग*

१९५८ *भला आदमी* (पहिला चित्रपट), *हम भी कुछ कम नहीं, मिस तुफान मेल, पहला पहला प्यार, सुन तो ले हसीना.*

१९५९ *सीआयडी गर्ल, एक अरमान मेरा, खुबसूरत धोखा, लाल निशान, लेडी रॉबीनहूड, मैंने जीना सिख लिया, टिन टिन टिन.*

१९६० *एअर मेल, महलों के ख्वाब, मि. सुपरमॅन की वापसी, नखरेवाली, जमीन के तारे.*

(अप्रदर्शित) *जासूस*

१९६१ *लकी नंबर, रजिया सुलताना, वारंट.*

१९६२ *बांके सांवरिया, काला समुंदर, मेहंदी लगी मेरे हाथ, रिपोर्टर राजू, वल्लाह क्या बात है.*

१९६३ *कमर्शियल पायलट ऑफिसर, हॉली डे इन बॉम्बे, जबसे तुम्हें देखा है, कहीं प्यार न हो जाये, फूल बने अंगारे, राजा, सुनहरी नागिन, जराक खान.*

१९६४ *आवारा बादल, बादशाह, दुल्हा दुल्हन हर्कुलस, मजबूर, मि. एक्स इन बॉम्बे, यादें.*

१९६५ *आधी रात के बाद, बेदाग, बॉक्सर, हिमालय की गोद में, हम दीवाने, जब जब फूल खिले, खाकान, लुटेरा, नमस्तेजी, श्रीमान फंटूश, टारझन कम्स टू देल्ही, तिसरा कौन.*

१९६६ *आसरा, आये दिन बहार के, छोटा भाई, डाकू मंगल सिंग, देवर, जवां मर्द, लाबेला, पती-पत्नी, प्रीत न जाने रीत, प्रोफेसर एक्स, सौ साल बाद, सुनहरे कदम.*

१९६७ *आमने-सामने, चंदन का पलना, फर्ज, जाल, मिलन, मिलन*

की रात, नाइट इन लंडन, तकदीर.
१९६८ हाय मेरा दिल, जुआरी, राजा और रंक, स्पाय इन रोम, तीन बहूरानियां.
१९६९ अंजाना, आराधना, आया सावन झुमके, दो भाई, दो रास्ते, हम एक है, जीने की राह, जिगरी दोस्त, ज्योती, माधवी, महल, मेरा दोस्त, राजा साब, साजन, शर्त, तमन्ना.
१९७० आन मिलो सजना, बचपन, दर्पण, देवी, गीत, हिम्मत, हमजोली, इश्क पर जोर नहीं, जीवन मृत्यू, कटी पतंग, खिलौना, मां और ममता, मस्ताना, मेरे हमसफर, माय लव, पुष्पांजली, शराफत, सुहाना सफर, (दि) ट्रेन.
१९७१ आप आये बहार आयी, अमर प्रेम, वनफूल, चाहत, दुश्मन, हाथी मेरे साथी, हरे रामा हरे कृष्णा, हसीनों का देवता, लाखों में एक, लगन, मैं सुंदर हूं, मर्यादा, महबूब की मेहंदी, मेरा गांव मेरा देश, नया जमाना, पराया धन, प्यार की कहानी, उपहार, वो दिन याद करो.
१९७२ अनोखी पहचान, अनुराग, अपना देश, बुनियाद, एक बेचारा, गोरा और काला, हारजीत, जवानी दीवानी, जीत, जोरू का गुलाम, मोम की गुडिया, पिया का घर, राजा रानी, रास्ते का पत्थर, रूप तेरा मस्ताना, संजोग, सीता और गीता, शादी के बाद, सुबह-ओ-शाम, ये गुलिस्तां हमारा, जमीन आसमान, जिंदगी जिंदगी.
१९७३ बॉबी, गाय और गौरी, गद्दार, हीरा पन्ना, इन्साफ, जैसे को तैसा, झिल के उस पार, जुगनू, कच्चे धागे, लोफर, मनचली, मिस्टर रोमियो, नमक हराम, नया नशा, कीमत, राजा रानी, रिक्शावाला, शरीफ बदमाश, सूरज और चंदा, स्वीकार.



रोटीमध्ये मुमताज - राजेश खन्ना : 'नाच मेरी बुलबुल तो पैसा मिलेगा...'



'ये शाम मसतानी मदहोश किये जाय...' कटि पतंगमध्ये राजेश खन्ना


१९७४ आपकी कसम, अजनबी, अमीर गरीब, बदला, बिदाई, चरित्रहीन, दिल दिवाना, दोस्त, दुल्हन, दुनिया का मेला, हमशकल, इमान, इश्क इश्क इश्क, कसौटी, मजबूर, मनोरंजन, पगली, पॉकेटमार, प्रेमनगर, प्रेमशास्त्र, रोटी, वादा तेरा वादा.
१९७५ आग और तुफान, आक्रमण, अंगाई, भूला भटका, चैताली, चुपके चुपके, जुली, लफंगे, नाटक, प्रतिज्ञा, प्रेम कहानी, राजा, शोले, सुनहरा संसार, वारंट.
१९७६ आपबीती, बालिका वधू, बारूद, बैराग, भंवर, बुलेट, चरस, दीवानगी, ढोंगी, दो लडकियां, जानेमन, जीवनज्योती, कोई जीता कोई हारा, माँ, महाचोर, महबूबा, नहले पे दहला, त्याग.
१९७७ आधा दिन आधी रात, आशिक हूं बहारों का, यही है जिंदगी, अमर अकबर अॅन्थोनी, अनुरोध, मुक्ति, अपनापन, चाचा भतिजा, चलता पूर्जा, छैला बाबू, चोर सिपाही, धरमवीर, डार्लिंग डार्लिंग, दिलदार, ड्रीमगर्ल, इमान धरम, कलाबाज, थीफ ऑफ बगदाद, टिंकू.
१९७८ आहुती, आजाद, अमर शक्ती, नौकरी, भोलाभाला, चक्रव्यूह, डाकू और जवान, दिल और दीवार, मैं तुलसी तेरे आंगन की, नया दौर, पती पत्नी और वोह, फांसी, फंदेबाज, प्रेम बंधन, शालीमार, सत्यम् शिवम् सुंदरम्, स्वर्ग नरक, तुम्हारी कसम.
१९७९ अमरदीप, दिल का हीरा, गौतम गोविंदा, (दि) ग्रेट गॅम्बलर, जुर्माना, काली घटा, लोक परलोक, मगरूर, मिस्टर नटवरलाल, प्रेम विवाह, सरगम, सुहाग, युवराज, जालिम.
१९८० आपके दिवाने, आशा, आसपास, अब्दुल्ला, अलिबाबा और चालीस चोर, बंदिश, चोरों की बारात, दो प्रेमी, दोस्ताना, हम पांच, जुदाई, ज्योती बने ज्वाला, कालापानी, कर्ज, मांग भरों सजना, निशाना, पतिता, कातिल कौन, राम बलराम, शान, टक्कर.
(अप्रदर्शित) कॅप्टन कर्ण, स्वीट हार्ट.
१९८१ बरसात की एक रात, दासी, एक दुजे के लिए, एक ही भूल, फिफ्टी फिफ्टी, ज्योती, क्रोधी, लव स्टोरी, मेरी आवाज सुनो, नसीब, रास्ते प्यार के, रक्षा, रॉकी, शारदा, वकील बाबू.
१९८२ आमने सामने, अपना बना लो, अशांती, अय्याश, बगावत, बेमिसाल, दर्द का रिश्ता, दावेदार, देशप्रेमी, दो दिशायें, फर्ज और कानून, गझल, इन्सान, जीवनधारा, जॉनी आय लव्ह यू, मैं इन्तकाम लूंगा, राजपूत, सम्राट, शक्ति, ताकत, तिसरी आँख, तेरी कसम, तेरी मांग सितारों से भर दूं, विधाता, यह तो कमाल हो गया.
१९८३ अंधा कानून, अर्पण, अवतार, बेकरार, बेताब, कुली, फरिश्ता, हीरो, लवर्स, मैं आवारा हूं, मुझे इन्साफ चाहिये, नास्तिक, प्रेम तपस्या, रोमान्स, वो सात दिन, ये इश्क नहीं आसान, जरा सी जिंदगी.
१९८४ आसमान, अकलमंद, ऑल राऊंडर, आवाज, बाजी, बद और बदमाश, एक नई पहेली, घर एक मंदिर, हम है लाजवाब, हम दोनों, इन्कलाब, जागिर, जीने नहीं दूंगा, जॉन जानी जनार्दन, खजाना, माटी मांगे खून, मेरा फैसला, मेरा दोस्त मेरा दुश्मन,




एक दुजे के लिएमध्ये कमल हासन - रती अग्निहोत्री



गदरमध्ये अमिषा पटेल - सनी देओल



दिल तो पागल हैमध्ये करिश्मा - शाहरूख - माधुरी



यादेंमध्ये करिना कपूर - हृतिक रोशन

फांसी के बाद, शरारा, सोहनी महीवाल, सनी, यह देश.

१९८५ आरपार, अलग अलग, जवाब, युद्ध, लावा, मेरा घर मेरे बच्चे, मेरी जंग, सरफरोश, यादों की कसम.

१९८६ आग और शोला, आखरी रास्ता, आप के साथ, ऐसा प्यार कहां, अमृत, अनोखा रिश्ता, बात बन जाये, दोस्ती दुश्मनी, एक मैं और एक तू, जाल, कर्मा, काला धंदा गोरे लोग, नाम, नाचे मयूरी, नगीना, पाले खाँ, कत्ल, सदा सुहागन, समुंदर, सौगात, स्वर्ग से सुंदर, स्वाती, शत्रू.

१९८७ चकमा, डकैत, हिफाजत, इन्साफ की पूकार, इतिहास, मददगार, मेरा करम मेरा धरम, नजराना, परिवार, संसार, सिंदूर, उत्तर दक्षिण.

१९८८ अग्नि, बीस साल बाद, चरणों की सौगंध, दो वक्त की रोटी, गंगा तेरे देशमें, घराना, इन्तकाम, कब्जा, वर्दी, खतरों के खिलाडी, खून बहा गंगा में, महावीरा, मर मिटेंगे, मिल गई मंजिल मुझे, प्यार का मंदिर, प्यार मोहब्वत, राम अवतार, रामा-ओ-रामा, साजिश, शहनशाह, तमाचा.

१९८९ आग से खेलेंगे, भ्रष्टाचार, चालबाज, चांदनी, देशवासी, दोस्त गरीबों का, एलान-ए-जंग, गरीबों का दाता, जुर्रत, मजबूर, निगाहें, राम लखन, सच्चाई की ताकत, शहजादे, त्रिदेव.

१९९० अग्निपथ, अंबा, अमीरी, गरीबी, आवारगी, दूध का कर्ज, फरिश्ते, हमसे ना टकराना, इज्जतदार, जीने दो, खिलाफ, क्रोध, पती पत्नी और तवायफ, प्रतिबंध, प्यार का कर्ज, शेर दिल, शेष नाग, वीरुदादा.

१९९१ अजूबा, अकेला, बंजारन, बेनाम बादशाह, हम, इज्जत, लक्ष्मणरेखा, खून का कर्ज, लम्हें, मस्ती कलंदर, पाप की आंधी, सौदागर, प्रतिकार, प्यार हुआ चोरी चोरी, प्यार का देवता, शिकारी, योद्धा.

१९९२ अंगार, अपराधी, चमत्कार, दिल ही तो है, हीर रांझा, हमला, जय जय शिवशंकर, खुदा गवाह, क्षत्रिय, मार्ग, परंपरा, पुलिस ऑफिसर, प्रेम दीवाने, विधाता.

१९९३ आशिक आवारा, बेदर्दी, चाहूंगा मैं तुझे, डर, दिल ने इकरार किया, गुमराह, इन्स्पेक्टर किरण, खलनायक, मुठ्ठी भर जमीन, पहला नशा, फूल, साहिबां, तुम करो वादा.

१९९४ अब इन्साफ होगा, औरत औरत औरत, चौराहा, मोहरा, पापी देवता, पहला पहला प्यार, स्वर्ग से प्यारा घर हमारा.

१९९५ आग का दरिया, आजमाईश, अहंकार, दिलबर, दिलवाले दुल्हनियां ले जायेंगे, प्रेम, राम जाने, रावण राज, त्रिमूर्ती.

१९९६ भीष्मा, धून, जान, जंग, प्रेमग्रंथ, राजकुमार, रीटर्न ऑफ ज्वेलथीफ, तेरे मेरे सपने, तू चोर मैं सिपाही.

१९९७ अफलातून, आखों में तुम हो, चिराग, दीवाना मस्ताना, दिल तो पागल है, गुलाम-ए-मुस्तफा, गुप्त, महानता, परदेस, कहर.

१९९८ बरसात की रात, दंड नायक, दुश्मन, जब प्यार किसीसे होता है, झूठ बोले कौवा काटे, महायुद्ध, शाम घनशाम, जख्म, जोर.

१९९९ आरजू, अग्निपुत्र, बुलंदी, दिल क्या करे, हिंदुस्तान की कसम, हम तुम पे मरते है, कच्चे धागे, कोहराम, ताल.

२००० हद कर दी आपने, मोहब्बतें, राजूचाचा.

२००१ असोका, छुपा रुस्तम, गदरःएक प्रेमकथा, इंडियन, कसम, नायकःद रीयल हीरो, प्यार इश्क मोहब्बत, राहुल, यादें, ये रास्ते है प्यार के.

२००२ क्रांती, कितने दूर कितने पास.

अपूर्ण-आगामी चित्रपटः
आरपार, बेबस, चोरी चोरी, दिलरुबा, दिलने इकरार किया, दुश्मन दोस्त, एक दो तीन चार, एक हिंदुस्तानी, हम किसीसे कम नहीं, हमसे बढकर कौन, जब प्यार हुआ, कलिंगा, लाठी, लेडीज ओन्ली, लव इन कश्मीर, लव यू हमेशा, मि. हसमुख, मेरी बीबी का जवाब नहीं, मुझसे दोस्ती करोगे, न तुम जानो न हम, पुलिस के पिछे पुलिस, प्यार दिवाना होता है, संगम होगा कि नही, तेरे प्यार की कसम.

नोंदः ★ आनंद बक्षींनी मोम की गुडिया (१९७२), बालिका वधू, चरस, महाचोर (१९७६) वगैरे चित्रपटांत पार्श्वगायनही केलं.

★ हिंदी चित्रपटाच्या इतिहासात ६००हून अधिक चित्रपटांसाठी गीतं लिहिणारे आनंद बक्षी हे एकमेव गीतकार होते.

संकलनः हरीश रघुवंशी